To use the proper grade of concrete as per the necessity for the design of different component.

विविध घटकांचे संकल्पन करतांना घटकांचे प्रयोजनानूसार आवश्यक दर्जा संधानकाचा वापर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : संकल्पन ०४११/(२६५/२०११) / मोप्र-१
मंत्रालय, मुंबई- ३२
दिनांक : १५ सप्टेंबर, २०११

## परिपत्रक

मध्यवर्ती संकल्पना संघटना, नाशिक तसेच क्षेत्रिय संकल्पचित्र कार्यालयामार्फत प्रकल्पांच्या विविध घटकांचे संकल्पन केले जाते व सदर संकल्पनास सक्षम स्तरावर मंजूरी देण्यात येते. विविध घटकांचे संकल्पन करताना, प्रचलीत codal तरतुदीं विचारात घेऊन, त्यानुसार कसीत कमी आवश्यक असलेल्या दर्जाच्या (Grade) संधानकाचा वापर केला जावा. जेणेकरुन अंदाजपत्रकात अनावश्यक आर्थिक वाढ होणार नाही. सुरक्षिततेे बरोबरच आर्थिक बचतीचा विचार होऊन संकल्पन करणे अभिप्रेत आहे. [उदा-(१) Gravity Retaining wall, Guide wall अशा स्वरुपाच्या भिंतीचे काटछेद हे तुलनेमध्ये मोठे असतात. अशा भिंतीच्या कामामध्ये Plum Concrete, कमी ग्रेडचे संधानक इत्यादीचा वापर करता येऊ शकतो. (२) विविध घटकांच्या संधानकाचे काम करताना सुरुवातीस तळाच्या भागात काही ठिकाणी नैसर्गीक कारणाने पडलेले मोठया आकाराचे खड्डे भरावे लागतात. अशा ठिकाणी संधानकाचे काम करताना प्रथमतः असे खड्डे योग्य पध्दतीने भरावे लागतात. अशा स्वरुपाचे काम करताना ते मुख्य घटकाकरीताच्या संधानकाच्या ग्रेडचे न करता त्याऐवजी कमी ग्रेडच्या संधानकाचे केल्यास किंवा अशा ठिकाणी Plum concrete, UCR masonry इत्यादीचा वापर केल्यास खर्चात बचत होऊ शकते. (३) संकल्पन करताना पाया पातळी निश्चित करण्यासाठी Trial pit, Trial bores इ. घेतली जातात. तथापी प्रत्यक्ष काम करताना संकल्पीत पातळीपेक्षा वरच्या पातळीवर पायासाठी योग्य दर्जाचा खडक लागू शकतो. अशा वेळी पायाचे खोदकाम मूळच्या संकल्पीत पातळीपर्यंत न करता प्रत्यक्षातील पायापातळीपर्यंत करावे, व त्या पायापातळीनुसार सुधारीत संकल्पन करण्यात यावे. त्यामुळे खर्चात बचत होऊ शकेल]

अशाप्रकारचे संकल्पन केल्यानंतर सदर संकल्पनास सक्षम स्तरावर मंजूरी देण्यापूर्वी क्षेत्रिय स्थितीचा विचार करुन सुरक्षिततेला कोणत्याही स्थितीत बाधा न येता काही बचत करणे शक्य आहे काय, याचाही विचार करणे गरजेचे आहे. अशी शक्यता असल्यास, त्याबाबतची कारणमिमासा उद्धृत करुन, मध्यवर्ती संकल्पन संघटना, नाशिक / क्षेत्रिय संकल्पचित्र कार्यालयकडे अभिप्रायासह पुनर्संकल्पनाकरीता संदर्भ करावा.

क्र ३५५ १७/८/१२ (२८) (४)

सुरक्षिततेला बाधा न येता आपल्या अभियांत्रिकी कौशल्य व अनुभवाचा पुरेपूर सुयोग्य वापर करुन प्रकल्पाची वा प्रकल्पाच्या विविध घटकाची किंमत न्यूनतम रहावी याबाबत संकल्पन तसेच बांधकाम यंत्रणेने दक्षता घ्यावी हा या परिपत्रकाचा प्रमुख उद्देश आहे याची जाणीव सर्वांनी ठेवावी.

सदरील शासन परिपत्रक शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक क्रमांक २०११०९१५१६३२४६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानूसार व नावाने,

(राजेश शहा)
शासनाचे उप सचिव

प्रत,

खाजगी सचिव, मा. मंत्री, (कृ.खो.पा.म. वगळून) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. मंत्री, (कृ.खो.पा.म.) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. मंत्री, (खारभूमी) जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री, खारभूमी जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, सचिव (जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(दवप्र)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(कृनातंल)व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
स्वीय सहायक, मु.अ.(पा), व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व तांत्रिक उपसचिव/अवरसचिव/उपअभियंता, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रत, आवश्यक कार्यवाहीसाठी,

कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे.
कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव.
कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद
कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर.
महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था, औरंगाबाद.
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय मुख्य अभियंता
मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग, येरवडा, पुणे
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय अधीक्षक अभियंता
जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यकारी अभियंता
मोप्र-१ कार्यासन संग्रहार्थ निवड धारिका

म सं स / ८ ध ७ / ४८६ दिनांक १० - १० - ११

D:\My Documents\APT\POL\G.R\GR 265.11 Mati Dharan.doc

कार्यकारी अभियंता, ८ ध-१, ८ ध-२, ८ ध ५ व वरिष्ठ शाखेकडील योग्या त्याठीकाणी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित.

कार्यकारी अभियंता